# भाषा साहित्य आणि संस्कृती

**डॉ. विजया जितेंद्र राऊत**
विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड
कॉमर्स नंदनवन, नागपूर 440024
मेल - rautvijaya1976@gmail.com
मो. नं. - 9850053414

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.64

---

***सारांश :***

*महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश आणि मराठी भाषा विकास परिषद यांच्या माध्यमातून मराठी भाषेला सामोरे नेण्याकरिता प्रयत्न केला जात आहे. मराठी ही आधुनिक ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा बनू शकली नाही. मराठी वाङ्मय समृद्ध आहे. मराठी भाषा प्राचीन आहे. अभिजात भाषेचा (Classical Language) दर्जा तिला मिळावा म्हणून आमचे प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नाला यश मिळेलही. पण मराठी ही ज्ञानभाषा बनलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. ज्ञानभाषा बनल्याशिवाय ती खऱ्या अर्थाने सिंहासनावर बसू शकणार नाही.*

*एखाद्या भाषेला ज्ञानभाषा बनवायचे असेल तर तिच्यामागे देशातील त्या त्या विषयांच्या अभ्यासकांनी, संशोधकांनी आणि विद्वानांनी आपली विद्वत्ता आणि शासनाने आपली सत्ता व संपत्ती उभी करणे आवश्यक आहे. सत्ता, संपत्ती व विद्वत्ता तिच्यामागे उभी राहिल्याशिवाय तिचा ज्ञानभाषा म्हणून विकास होणे शक्य नाही. या घटकांच्या सहाय्याशिवाय त्या भाषेला महत्त्व प्राप्त होणार नाही. केवळ ती भाषा लोकांच्या बोलचालीची भाषा असून चालणार नाही. त्या भाषेचा वापर विद्वानांनी व शासनाने केल्याशिवाय ती महत्पदाला पोहोचत नाही. संस्कृत भाषेचेच उदाहरण घ्या. प्राचीन काळातील विद्वानांनी व राजांनी तिचा वापर केला. विद्वानांनी आपली विद्वत्ता आणि राजांनी आपली सत्ता व संपत्ती तिच्यामागे उभी केली म्हणूनच ती ज्ञानभाषा झाली. ती अभिजनांची भाषा ठरली. प्राकृत भाषा ह्या लोकभाषा होत्या. त्या ज्ञानभाषा नव्हत्या. प्राकृत भाषा या लोकांनी प्रचलनाचा आणल्या. पण त्यांचा विकास संस्कृत इतका झाला नाही. ज्या ज्या प्राकृत भाषांमागे अभिजन वर्ग उभा राहिला त्या त्या वेळी ज्ञान वहन करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली. भाषेच्या विकासासाठी राज्याश्रय आणि विद्वानाश्रय हवा.*

*भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यातच असते. विविध विषयांचे विचार अर्थात ज्ञान जी भाषा समर्थपणे अभिव्यक्त करू शकते तीच खरी ज्ञानभाषा. म्हणून लोकभाषा हीच ज्ञानभाषा असली पाहिजे. पण मागच्या काळात लोकभाषा ही ज्ञानभाषा नव्हती. प्राचीन काळी संस्कृत ज्ञानभाषा होती पण ती लोकभाषा नव्हती. ती अभिजनांची भाषा होती. ती विद्वानांची भाषा होती. मध्ययुगीन काळात मुस्लिमांच्या ताब्यात देश गेला. राज्यकारभाराची भाषा त्याकाळी फारसी किंवा उर्दू होती. नंतर इंग्रजांचे राज्य आले. त्यांनी इंग्रजीतून*

*राज्यकारभार केला. उर्दू ही अगदी अलीकडच्या काळातली भाषा आहे. खरे तर ती लोकभाषाच आहे. उर्दूच्या मागे मुस्लिम राज्यकर्त्यांनी आपली सत्ता व संपत्ती उभी केली. म्हणून ती ज्ञानभाषा झाली. निजामाच्या हैदराबाद रियासतीत प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंतचे माध्यम उर्दू हेच होते. सर्वच ज्ञान शाखांचे उच्चशिक्षण हे निजामाने उर्दूत आणले. सर्व राज्यकारभार हा त्यांनी उर्दूतून चालवला. कायदे त्यांनी उर्दूत केले. सगळी न्यायव्यवस्थाही त्याने उर्दूतून चालवली. हैदराबाद संस्थानात सर्व व्यवहार उर्दू माध्यमातून चालत होते . उर्दूच्या विकासासाठी त्याने आपली सर्व सत्ता व संपत्ती खर्च केली आणि अशाप्रकारे उर्दू ही ज्ञानभाषा म्हणून विकास पावली.*

*मराठी ही लोकभाषा आहे. तिला अलीकडे लोकशाहीच्या उदयामुळे राज्याश्रय मिळाला आहे. लोकशाहीतला राज्यकारभार हा लोकभाषेतच व्हायला पाहिजे. लोकशाहीतला राज्यकारभार हा खऱ्या अर्थाने 'लोककारभार' व्हायचा असेल तर लोकभाषेतच चालला पाहिजे. इतकेच नव्हे तर उच्चशिक्षणाचे माध्यमदेखील लोकभाषा हेच असले पाहिजे. त्याचबरोबर कायदेदेखील लोकभाषेतच व्हायला हवेत. सगळी न्यायव्यवस्था व न्यायव्यवहार लोकभाषेतूनच चालला पाहिजे.*

*भाषा साहित्य आणि संस्कृती यांच्यातील अंत: संबंध समजून घेण्याची आवश्यकता आहे. भाषा हे अभिव्यक्तीचे आणि संवादाचे साधन आहे. भाषेमुळेच साहित्यनिर्मिती शक्य झाली आणि संस्कृतीच्या विकासाला साहित्याचा आधार मिळाला. संस्कृती हा शब्द संस्कृतपासून आला आहे. भारतीय संस्कृतीची मूल्ये संस्कृत साहित्यातील मूल्ये आहेत आणि म्हणून संस्कृत भाषा, संस्कृत साहित्य आणि भारतीय संस्कृती या तिन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत हे उघड आहे. त्यांच्यातील अंत: संबंध हे अतिशय जिव्हाळ्याचे आहेत यात शंका नाही. संस्कृती उभी राहते ती काही श्रद्धांवर, कल्पनांवर, मूल्यांवर, विचारांवर आणि आदर्शांवर. या श्रद्धांचे,कल्पनांचे, मूल्यांचे, विचारांचे व आदर्शांचे संवर्धन होते ते साहित्याच्या माध्यमातून. साहित्यामुळेच संस्कृतीला निरंतरता आणि चिरंतनता प्राप्त होते. संस्कृतीचा संबंध मूल्यांशीच असतो. संस्कृतीमध्ये माणसाचे भौतिक, नैतिक आणि अध्यात्मिक जीवन प्रतिबिंबित होत असते. संस्कृतीला अभिव्यक्ती देण्याचे काम साहित्य, संगीत,नृत्य,चित्र, शिल्प, वास्तू अशा कला करीत असतात. या सर्वांच्या मागे विशिष्ट कल्पना (Motifs) असतात. आपले काल्पनिक जग हे रूपकांच्या आणि मिथकांच्याद्वारे व्यक्त करीत असतो. साहित्य ही आपली सांस्कृतिक संपदा आहे. शब्द हेच आपले धन आहे.*

---

**प्रस्तावना :**

मराठी भाषा दिन साजरा करीत असताना आपण एकीकडे मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त करीत असतो आणि दुसरीकडे तिच्या भवितव्याविषयी चिंताही व्यक्त करीत असतो. भाषिक तत्त्वावर १९५६ साली राज्यांची पुनर्रचना झाली. पण या तत्वाला डावलून द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाली. खरे तर हा मराठी भाषिकांवर झालेला अन्याय होता. त्याविरुद्ध संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. मुंबई शहर हा वादाचा विषय होता. त्यासाठी १०५ मराठी भाषकांचे बलिदान झाल्यानंतर मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आली. विदर्भ व

मराठवाडा हे विभाग महाराष्ट्रात आले.तरीपण हा खऱ्या अर्थाने संपूर्ण संयुक्त महाराष्ट्र नव्हता. बेळगाव, निपाणी, भालकी सहीत सीमा भागातील अनेक गावे महाराष्ट्रात आलीच नाहीत. महाराष्ट्रात विलीन होण्यासाठी सीमा भागातील मराठी भाषकांनी फार मोठा लढा दिला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. सुप्रीम कोर्टात हा प्रश्न आज प्रलंबित आहे .

नवमहाराष्ट्राची निर्मिती १९६० साली झाली. मराठीला राज्यभाषेचा दर्जा मिळाला. तरीपण मराठी ही खऱ्या अर्थाने सिंहासनावर विराजमान झाली नाही. कारण शासन व्यवहार, राज्यकारभार अर्थात प्रशासन मराठीत आले नाही. विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच राहिले. न्यायव्यवस्थाही इंग्रजीतूनच चालते. राज्याचे कायदे होतात तेही इंग्रजीतून खालपासून वरपर्यंत कोर्टातले न्यायनिवाडे होतात तेही इंग्रजीतूनच. इतर प्रादेशिक भाषांचीही जवळपास हीच अवस्था आहे. इंग्रजी हटावच्या घोषणा देऊन इंग्रजी हद्दपार होणार नव्हती. कार्यालये, इमारती आणि दुकानांवरच्या पाट्या बदलूनही फारसा उपयोग होणार नव्हता. प्रशासन, उच्च शिक्षण व न्यायव्यवस्था या सर्वांचे वहन करण्याइतके सामर्थ्य मराठी भाषेत नव्हते व नाही. हे वास्तव मराठीचे केवळ गोडवे गाऊन लपवता येणार नाही. सर्व स्तरावरच्या शिक्षणाचे माध्यम मराठी झाल्यानंतर आणि त्यातून काही पिढ्या बाहेर पडल्यानंतरच राज्य कारभाराचे,कायदे मंडळाचे, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे व न्यायालयाचे माध्यम हे प्रादेशिक भाषा बनू शकतील, हे सर्वप्रथम कोठारी शिक्षण आयोगाच्या लक्षात आले. या आयोगाने सर्व स्तरांवरचे शिक्षण प्रादेशिक भाषेत असावे अशी शिफारस केली. त्याने त्रिभाषा सूत्र सुचविले. किमान तीन भाषा प्रत्येक सुशिक्षित भारतीयाला आल्या पाहिजेत, असे त्याने सुचित केले. इंग्रजीचे स्थान हे Library Language चे असावे. तिचा आधार घेत घेतच भारतीय भाषांचा विकास साधावा असे या आयोगाचे म्हणणे होते. प्रादेशिक भाषांमध्ये उच्च दर्जाची पुस्तके निर्माण करण्यासाठी प्रत्येक राज्यात पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ स्थापावे अशी शिफारस या आयोगाने केली. अर्थात ही शिफारस सर्व राज्यांनी स्वीकारली. महाराष्ट्राने या सूचनेनुसार नागपूर येथे Textbook Bureau ची स्थापना केली. पण उत्साह ओसरलेला होता, आणि हे काम ठप्प झाले. परिणामतः मराठी भाषेचा विकास ज्ञानभाषा म्हणून आम्ही करू शकलो नाही. मराठी राज्यभाषा असूनही ती खऱ्या अर्थाने सिंहासनावर बसू शकली नाही. पण आम्ही याकडे फारसे लक्ष दिले नाही. उलट आमची वाटचाल ही उलट्या दिशेने चालू झाली आहे. शिक्षणाचे माध्यम हे क्रमाक्रमाने खालपासून वरपर्यंत गेले पाहिजे. पण ते आज वरून खाली आलेले आहे. परिणामतः मराठी शाळा बंद पडत चालल्या आहेत. शासन आपली ही जबाबदारी कार्पोरेट क्षेत्रावर हळूहळू सोपवीत आहे. कार्पोरेट क्षेत्र हे इंग्रजीलाच प्राधान्य देणार हे उघड आहे. लोकभाषेचा विचार ते करणार नाही.

शिक्षणाचा प्रसार ही खरे तर राज्याची जबाबदारी आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जगातील सर्वच देशांनी शिक्षणाच्या प्रसाराची जबाबदारी ही राज्याची मूलभूत जबाबदारी आहे हे तत्व मान्य केले होते. इतकेच नव्हे तर त्यांनी प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे केले. लोकशाही जसजशी विकसित होत गेली तसतशी ही जबाबदारी राज्यांना स्वीकारणे भाग पडले. लोकशाही राष्ट्रांनी सार्वत्रिक मतदानाला जेवढे महत्त्व दिले तेवढेच महत्त्व त्यांनी सार्वत्रिक शिक्षणालाही दिले. सार्वत्रिक शिक्षणाशिवाय सार्वत्रिक मतदानाला अर्थ प्राप्त होत नाही. त्याशिवाय लोकशाही ही लोकमानसात आणि लोकव्यवहारात रुजू शकत नाही. ही गोष्ट जगातील जवळपास

सर्वच लोकशाही राष्ट्रांनी मान्य केली आहे.

प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून दिले तर बालकांची आकलनशक्ती चांगल्या प्रकारे वाढते ही गोष्टही निर्विवाद आहे. मातृभाषा ही आईच्या दुधाबरोबर बालके शिकत असतात. मातृभाषा शिकण्यासाठी दुसऱ्या कोणत्याही भाषेचा आधार घ्यावा लागत नाही. उलट दुसरी कोणतीही भाषा मातृभाषेचा आधार घेतल्याशिवाय शिकता येत नाही आणि म्हणून किमान प्राथमिक शिक्षण तरी मातृभाषेतूनच द्यायला पाहिजे. शिक्षण प्रक्रियेतून बालकांना केवळ ज्ञानच मिळत नाही, तर संस्कारदेखील मिळतात. ज्ञानाला संस्काराची जोड मिळाली तर विद्यार्थी सांस्कृतिक मूल्येदेखील आत्मसात करतील. पण दुर्दैवाने आज मातृभाषेकडे दुर्लक्ष होत चाललेले आहे मराठी भाषा अलीकडे बंद पडत चालले आहे. मराठी शाळा अलीकडे बंद पडत चाललेल्या आहेत. खेड्यापाड्यातून देखील इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटले आहे. इंग्रजीतून शिकवणाऱ्या शिक्षकांचा अभाव असून देखील इंग्रजी शाळांचा हव्यास धरला जातो आहे. अशा शाळांना दुकानदारीचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. परिणामतः शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. जागतिकीकरणाचा हा प्रभाव आहे. मराठीचे अस्तित्वच आज धोक्यात आले आहे. मराठीचे अस्तित्व धोका येणे म्हणजे मराठी संस्कृतीच धोक्यात येणे होय. मराठी ही लोकभाषा आहे. ती ज्ञानभाषा व्हावी अशी इच्छा असतांना तिच्या अस्तित्वात धोका निर्माण व्हावा ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे.

मराठीला आणि मराठी माणसाला जागतिक पातळीवर उभे करण्यासाठी एकीकडे जागतिक मराठी परिषदा आणि विश्व मराठी साहित्य संमेलने आपण आयोजित करीत आहोत आणि दुसरीकडे शिक्षणातून तिला पद्धतशीरपणे हद्दपार करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. शिक्षणातून मराठी हद्दपार झाली तर मराठीला उद्या बोलीचे स्वरूप प्राप्त होईल.

माणूस हा बहुभाषिक प्राणी आहे. तो एकापेक्षा अधिक भाषा शिकू शकतो. इतकेच नव्हे तर एकापेक्षा अधिक भाषांच्या माध्यमातून आपले व्यवहार तो विस्तारित करू शकतो. इंग्रजी सारखी परकी भाषा शिकण्यासाठी त्याला स्वतःच्या भाषेला तिलांजली देण्याचे खरे व काही कारण नाही. इंग्रजी ही आज जागतिक भाषा बनलेली आहे. सत्तेच्या आधारावर ती जगात विस्तारली होती आणि आज तर ज्ञानसत्तेच्या आधारावर तिने सगळे जग पादाक्रांत केले आहे. आपली भाषा ही आपल्या अस्मितेचा विषय असतो आणि म्हणून युरोपियन राष्ट्रांनी आपल्या भाषांना ज्ञानभाषा बनविले आहे. चीन, जपान या आशियाई राष्ट्रांनी देखील आपल्या भाषा ह्या ज्ञान वहनासाठी सक्षम बनविल्या आहेत. भाषिक परावलंबित्व हे अंततः राष्ट्रालाही परावलंबी बनवू शकते.

देश स्वतंत्र झाल्यानंतर इंग्रजीचे स्थान भारतीय भाषांना दिलेच पाहिजे. आपण आपली भाषा सोडणे म्हणजे आपल्या मुलांवर स्वतःच्या हातानी कु-हाड चालविणे होय. जागतिकीकरणाच्या या युगात स्थानिकीकरणालाही तेवढेच महत्त्व आहे. आकाशात भराऱ्या मारणाऱ्या पक्षाला आपले घरटे विसरून कसे चालेल? पक्षी आकाशात उडू शकतो पण तो आकाशात आपले घरटे बांधू शकत नाही. आपल्या अस्तित्वाची मुळे आपल्या भाषेत, आपल्या साहित्यात आणि आपल्या संस्कृतीमध्ये आहेत. मुळे जेवढी खोल व चहूबाजूंनी पसरतील तेवढ्या प्रमाणात आपल्या संस्कृतीचा वृक्ष वाढेल. भाषा हा माणसाचा सर्वोच्च व सर्वोत्तम शोध आहे.

माणसाच्या गरजेतून भाषा निर्माण झाली आहे. निसर्गाने माणसाला 'स्वर' दिला, आणि माणसाने त्या स्वरातून 'शब्द' निर्माण केले. निरनिराळ्या वस्तूंना ओळखण्यासाठी त्याने आपल्या स्वरातून शब्दसंपत्ती निर्माण केली. भाषा हा माणसाच्या उत्क्रांतीचा अविभाज्य भाग आहे. 'भाषांचे भवितव्य' या आपल्या लेखात थोर भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी भाषा निर्मितीची कथा सांगितली आहे. 'बिग बॅंग' हे विश्वनिर्मितीचे कारण सांगितले जाते. हे कारण वैज्ञानिकांनी मान्य केले आहे.

आजच्या टप्प्यावर पुन्हा एकदा भाषा नाहीशा होत आहेत. डॉ. गणेश देवी सांगतात की सध्या जगभरात लहान-मोठ्या सुमारे सहा हजार भाषा बोलल्या जातात. आपल्या देशातील बऱ्याच बोली नष्ट झाल्या आहेत, होत आहेत. एखादी भाषा बोलणाऱ्यांची संख्या घटली की ती भाषा मृतप्राय होते. त्याची अनेक कारणे आहेत. त्या भाषिकांची आपल्या भाषेविषयीची उदासीनता, शासनाची चुकीची भाषिक धोरणे, जागतिकीकरणाचा भाषांवर होणारा परिणाम, प्रचंड गतीने वाढलेले स्थलांतर, नवे तंत्रज्ञान, इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे अमाप पीक वगैरे त्याला कारणीभूत आहेत. हे डॉ. गणेश देवींनी आवर्जून सांगितले आहे.भाषा मृतप्राय होण्याची जी कारणे आहेत त्यांची दखल घेणे आवश्यक आहे. बोलणारे हे आपल्या भाषेविषयी उदासीन असता कामा नयेत. उलट त्यांनी आपल्या भाषेत विपुल अशी साहित्यनिर्मिती केली पाहिजे. सरकारने आपले भाषिक धोरण निश्चित केले पाहिजे आणि काटेकोरपणे ते राबविले पाहिजे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे माध्यम हे मराठीच असले पाहिजे. प्राथमिक शाळांचे खाजगीकरण करता कामा नये. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे माध्यम काही काळ इंग्रजी असेल. सामाजिक शास्त्रांचे उच्च शिक्षण मात्र मराठीत दिले पाहिजे. उत्कृष्ट इंग्रजी संदर्भ ग्रंथांचा अनुवाद मराठीत करण्याची आवश्यकता आहे. संस्कृतचा आधार घेऊन सर्व भारतीय भाषांसाठी पारिभाषिक शब्दकोश बनविण्याची आवश्यकता आहे. कोश वाङ्मयाची निर्मिती विपुल प्रमाणात झाली पाहिजे.

भाषा समृद्ध असेल तर साहित्यदेखील समृद्ध असणार यात काही शंका नाही. भाषेच्या समृद्धीतून साहित्याची समृद्धी आणि साहित्याच्या समृद्धीतून संस्कृतीची समृद्धी वाढते आणि विस्तारते. भाषा, साहित्य आणि संस्कृती या तिन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. त्या एकमेकींना समर्थ बनवितात. लुडविग विट्जेन्स्टाइन (Ludwig Witgenstein) हा तत्वज्ञ म्हणतो,'The limits of my language mean the limits of my power.' भाषेच्या मर्यादा या माझ्या विश्वाच्या मर्यादा आहेत. भाषेची समृद्धी ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची शक्ती व सत्ता वाढविते. भाषिक सामर्थ्यातूनच विकासाचे मार्ग आपल्या पायाखाली येतात. विचाराच्या कक्षा ती वाढविते. विकासावर साहित्याचा विकास अवलंबून असतो आणि साहित्याच्या विकासावर संस्कृतीचा विकास अवलंबून असतो. जवाहरलाल नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे, Culture is the widening of mind and spirit .' भाषेने मानवजातीला प्रकाशात आणल्यामुळे माणसाच्या प्रतिभेला पंख फुटले. कथा- कविता- कादंबरीच्या माध्यमातून त्याने मानवी जीवनाचे व संस्कृतीचे सृजन केले. साहित्याच्या माध्यमातून त्याने प्रतिसृष्टीस निर्माण केली.

संस्कृती ज्या उदात्त मूल्यांवर उभी असते ती मूल्ये आपल्या जीवनामध्ये 'सुसंवाद'(Harmony ) निर्माण करतात. साहित्य आणि विविध कला यादेखील सुसंवादच निर्माण करतात. संगीतामध्ये स्वरांचा सुसंवाद असतो,

चित्रकलेमध्ये रंग-रेषांचा सुसंवाद असतो आणि साहित्यामध्ये शब्दांचा सुसंवाद असतो. सुसंवाद आणि सुसंगती निर्माण करणे हे साहित्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. साहित्य हे मानवी जीवनाचे सृजन करते. ते साहित्य मग ललित असेल अथवा वैचारिक. साहित्याच्या विकासावरच संस्कृतीचा विकास अवलंबून असतो.

भाषा,साहित्य आणि संस्कृती हे घटक स्थिर-स्थितीशील-गतिहीन कधीच नसतात. ते गतिशील व चैतन्यशील असतात. भाषा बदलत जाते .नदीचा प्रवाह बदलत जातो त्याप्रमाणे नवनवीन शब्दांची भाषेत भर पडत जाते. बोलण्याचे रंगढंग बदलतात. प्राचीन मराठी आणि आधुनिक मराठी यामध्ये बराच फरक दिसून येतो. प्राचीन मराठी साहित्य आणि आधुनिक मराठी साहित्य यांच्यामध्ये देखील बराच मोठा फरक आपल्याला जाणवतो. समाज आणि संस्कृती ही काळाबरोबर बदलतात. समाजात सतत वादविवाद चालू असतात. चळवळी चालू असतात. दुसरीकडे संवादही चालू असतो. समुद्र शांत कधी नसतो. त्यात अहर्निश लाटा निर्माण होतात. आमच्या श्रद्धा बदलतात, कल्पना बदलतात आणि विचारही बदलतात. भाषा, साहित्य आणि संस्कृती या तिन्हीही घटकांना जीवशास्त्रीय सिद्धांत लागू पडतात. भाषा ,साहित्य आणि संस्कृती यांच्यातील संबंध हे परस्परावलंबी (Symbiotic relationship) असतात. त्यांच्यातील सहजीवन हे सर्व घटकांना संपन्न असते.

मराठी भाषा, मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांचा विकास कसा झाला व कोणी केला हे पाहणे उद्बोधक ठरेल. मराठी संस्कृती ही निरनिराळ्या संप्रदायांनी, सांप्रदायिक चळवळींनी समृद्ध केली आहे. तिच्यात प्रकाश आणि माधुर्याचा संगम आढळतो. वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय आणि जैन संप्रदाय यांनी आपली मराठी भाषा व संस्कृती उजळली आणि उद्धरली आहे. या संप्रदायांची 'त्रिधारा' महाराष्ट्राच्या भूमीवर वाहिलेली आहे. संत हे विदग्ध प्रकृतीचे होते.त्यांना आध्यात्मिक समता प्रस्थापित करावयाची होती. त्यांच्या मनात जनसामान्यांविषयी कळवळा होता. विठ्ठल हे त्यांचे दैवत. भक्ती आंदोलन त्यांनी छेडले होते. संत हे लोकसंस्कृतीचे निर्माते होते. संतांचे भक्ती आंदोलन हे खरे तर देशव्यापी आंदोलन होते. सर्वच भारतीय भाषांमध्ये संतकाव्याची निर्मिती झाली आहे. भक्ती हे संतांचे असिधारा व्रत होते. तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत संतांचे भक्ती हे संतांचे आंदोलन देशात चालू होते.

साहित्य हे आपल्या हृदयात संस्कृतीचा गर्भ धारण करते. साहित्याची उत्कृष्टता ते कोणत्या मूल्यांचे संवर्धन, संक्रमण व सृजन करते यावर ठरते 'हे विश्वाचे माझे घर' हा उदात्त विचार देणारा प्रतिभाशाली कवीच 'पसायदान' लिहू शकतो. 'पसायदान' या अलौकिक कवितेत 'विश्वात्मकता' आविष्कृत झाली आहे. मराठी भाषेचा व साहित्याचा विकास सामान्य मराठी भाषक स्त्रीपुरुषांनी केला आहे हे विसरता कामा नये. कोणत्याही प्राकृत भाषेचा विकास सामान्य स्त्री-पुरुषांनीच केलेला आहे असे आढळून येते. मराठी ही लोकभाषा. तिचे संवर्धन सामान्य मराठी भाषिकांनी केले. मराठीतले लोकसाहित्य देखील त्यांनीच निर्माण केले. मराठी ही त्यांची माय कोणत्याही भाषेतील लोकवाङ्मय हे अभिजातच असते. अनामिक स्त्री-पुरुषांनी मराठी लोकसाहित्य निर्माण केले आणि त्याचे संवर्धनही त्यांनीच केले. अभिजनांनी लोकसाहित्याकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून येते. संत हे सामान्य जगातून आल्यामुळे लोकभाषेत त्यांनी आपले साहित्य निर्माण केले. संत साहित्य हे अभिजात साहित्य आहे. मराठी भाषेला महानुभावांचे योगदानही महत्त्वाचे आहे याचा उल्लेख आधी केलेलाच आहे. विशेषतः

मराठी गद्याचा महानुभावांनी विकास केला. आपले तत्त्वज्ञान त्यांनी मराठीतून मांडले. स्वामी श्रीचक्रधर व त्यांच्या शिष्यांनी जाणीवपूर्वक मराठीचा वापर केला. त्यांनी मराठीत लिहिले. मराठीने गद्याचा पाया रचला. मध्ययुगीन मराठी गद्याला बखरकरांनी देखील अतिशय मोलाचे योगदान दिलेले आहे, असे दिसून येते.

न्या. महादेव गोविंद रानडे यांनी मराठी साहित्य संमेलनाचा पाया घातला. महाराष्ट्रातील विविध विभागांतील साहित्य परिषदांनी मराठी भाषेच्या व साहित्याच्या विकासासाठी बरेच प्रयत्न केले आहेत. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या बडोदा संस्थानात मराठी व गुजराती भाषांमध्ये ग्रंथ निर्माण करण्यासाठी खूप प्रोत्साहन दिले. मध्ययुगीन काळात संतांनी आपल्या काव्यातून जसा समाज ढवळून काढला तसा आधुनिक काळात समाज सुधारकांनी आपल्या विचारातून समाज परिवर्तनाचे कार्य हाती घेतले. समाज सुधारणेच्या चळवळी त्यांनी सुरू केल्या. बंगालमध्ये ब्रह्मसमाज, उत्तर भारतात आर्य समाज, महाराष्ट्रात प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज आणि दक्षिणेत थियोसोफिकल सोसायटी यांच्या माध्यमातून समाज प्रबोधन सुरू झाले. आपापल्या भाषांतून त्यांनी आपले विचार मांडले. महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी मराठी भाषेला आपल्या विचारांचे योगदान दिले. मध्ययुगीन काळातल्या सांप्रदायिक चळवळींनी मराठीचा जसा विकास केला तसा आधुनिक युगात विविध संस्था आणि संघटनांनी मराठीला योगदान दिले. संतांनी पद्याच्या माध्यमातून आपले विचार मांडले तर समाज सुधारकांनी गद्यातून. सत्यशोधकांनी बहुजनांचे प्रश्न वेशीवर टांगले. सत्यशोधकी लेखकांनी विपुल साहित्य निर्माण केले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात देशात निरनिराळ्या विचारांचे प्रवाह सुरू झाले. एकामागून एक अशा विचारसरणीचा प्रादुर्भाव झाला. मार्क्सवाद, समाजवाद, गांधीवाद या विचारसरणीचा प्रभाव जनमानसावर होऊ लागला. विसाव्या शतकातील समाजजीवन याा विचारसरणींनी व्यापून टाकले. इंग्रजी भाषा आणि साहित्याच्या सहवासाने मराठी भाषा आणि साहित्यही समृद्ध होऊ लागले. आधुनिक ज्ञान-विज्ञानाचे प्रवाह मराठी साहित्यातून वाहू लागले आणि असे असले तरी ज्ञानभाषा म्हणून तिचा पूर्ण विकास होऊ शकल नाही.

देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय प्रादेशिक भाषांना राज्यभाषा म्हणून त्या त्या प्रांतात मान्यता मिळाली. उच्च दर्जाचे साहित्यही निर्माण झाले व होत आहे. पण ज्ञानभाषा म्हणून त्यांचा विकास झाला नाही. इंग्रजीचे स्थान त्यांना अद्याप घेता आलेले नाही. उच्चशिक्षणाचे माध्यम आजही इंग्रजीच आहे. कायदेमंडळाची, न्यायपालिकेची व प्रशासनाची भाषा इंग्रजीच आहे. तशातच जागतिकीकरणाच्या जात्यात बऱ्याच भारतीय भाषा आज भरडल्या जात आहेत. भाषा हीच एखाद्या समुदायाची सांस्कृतिक ओळख असते. म्हणून महाराष्ट्र शासनाने आपले भाषिक धोरण निश्चित केले पाहिजे. भाषासंधारण ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. आपण आपल्या भाषेविषयी उदासीन असता कामा नये. उच्च शिक्षण मराठी माध्यमातून देण्यासाठी मराठी ही ज्ञानभाषा बनली पाहिजे. महाराष्ट्रातील विद्यापीठांचे ते काम आहे. बहुभाषिक व बहुसांस्कृतिक देशात हे काम अवघड आहे. पण 'केल्याने होत आहे रे' हा मंत्र सोडता कामा नये.

'लाभले भाग्य आम्हा बोलतो मराठी,
एकतो मराठी,जाणतो मराठी,मानतो मराठी'

एवढेच मराठी भाषेविषयी म्हणावेसे वाटते. म्हणून थांबता कामा नये. मराठीला ज्ञानवाहिनी बनविण्याचे कार्यही आपण केले पाहिजे.

**निष्कर्ष :**

1. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यातच असते. विविध विषयांचे विचार अर्थात ज्ञान जी भाषा समर्थपणे अभिव्यक्त करू शकते तीच खरी ज्ञानभाषा.
2. प्रशासन, उच्च शिक्षण व न्यायव्यवस्था या सर्वांचे वहन करण्याइतके सामर्थ्य मराठी भाषेत नव्हते व नाही. हे वास्तव मराठीचे केवळ गोडवे गाऊन लपविता येणार नाही.
3. मराठी ही लोकभाषा आहे. तिला अलीकडे लोकशाहीच्या उदयामुळे राज्याश्रय मिळाला आहे.
4. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे माध्यम हे मराठीच असले पाहिजे.
5. भाषा समृद्ध असेल तर साहित्यदेखील समृद्ध असणार यात काहीच शंका नाही.
6. भाषेच्या विकासावर साहित्याचा विकास अवलंबून असतो.
7. साहित्य हे प्रकाश आणि माधुर्याचा आविष्कार करीत असते.
8. साहित्याच्या विकासावरच संस्कृतीचा विकास अवलंबून असते.
9. साहित्य हे आपल्या हृदयात संस्कृतीचा गर्भ धारण करीत असते.

**संदर्भसूची :**

- 'मार्क्सवादी साहित्यविचार' - केशव शिरवाडकर
- 'साहित्य व सामाजिक संदर्भ' - रा.ग .जाधव
- 'अक्षर वाड्.मय त्रैमासिक' - नानासाहेब सूर्यवंशी
- 'समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना' - रमेश वरखेडे